। कृण्वन्तो विश्वमार्यम् ।

# स्वधर्माचें सत्य स्वरूप

लेखक

" एक मित्र "

— प्रकाशक —

**लक्ष्मणराव ओघले**

संचालक-श्रद्धानंद स्मृतिग्रंथ माला, माटुंगा.

आवृत्ति दुसरी.

प्रति ५००० ]     किंमत ८)॥     [ सन १९२६

# संग्राह्य पुस्तकें विक्रीस तयार

| | | | |
|---|---|---|---|
| लाला लजपतराय (चरित्र) | २—८—० | ईश्वरप्राप्तीचें साधन | ०—०—६ |
| स्वामी दयानंद (चरित्र) | १—४—० | श्रीमान मतांचें परिक्षण | ०—०—६ |
| सत्यार्थ प्रकाश | ०—८—० | स्त्रियांच्या लुटीचीं कारणें | ०—०—६ |
| स्वामी श्रद्धानंद (चरित्र) | ०—१२—० | पंचमहायज्ञ | ०—०—९ |
| आर्यसमाजाचा संदेश | १—४—० | काय धर्म नको ! | ०—०—६ |
| स्वामी दयानंद (परिचय) | ०—८—० | वैदिक संध्याग्निहोत्र | ०—०—३ |
| गृहस्थाश्रम | ०—३—० | तुकारामाचा सदुपदेश | ०—०—६ |
| भूमिका-प्रकाश (सार्थ हिंदी) | ०—१२—० | वैदिक विवाह-पद्धती | ०—०—६ |
| भजनावलि (शिवानंद) | ०—४—० | उपनयन-संस्कार | ०—०—६ |
| गुरुदत्त विद्यार्थी (चरित्र) | ०—१—६ | संध्योपासना | ०—१—० |
| वैदिक धर्म स्वरूप | १—०—० | द्वैत व अद्वैत विचार | ०—१—० |
| दयानंदांच्या घोडचुका | ०—०—६ | ईश्वर-स्वरूप | ०—०—६ |
| रामभक्तिचें रहस्य | ०—०—६ | पुराणांची उत्पत्ति | ०—२—६ |
| प्राचीन आर्यावर्त | ०—०—६ | जीवरक्षा | ०—०—६ |
| आमचे स्वामी | ०—०—६ | ग्रहण-माहात्म्य | ०—०—६ |
| धार्मिक भूलभुलवण्या | ०—०—६ | अद्भुत चमत्कार | ०—०—६ |
| कुंभ-महात्म्य | ०—०—६ | ईश्वर-जीव-संबंध | ०—०—६ |
| आर्यसमाज काय आहे ? | ०—०—६ | दलितोद्धार | ०—०—६ |
| कलियुग | ०—०—६ | हिंदुंचा विश्वासघात | ०—०—६ |
| अवतार | ०—०—६ | हिंदुचा भयंकर भ्रम | ०—०—६ |
| सच्ची गोष्ट | ०—०—६ | ब्रह्मचर्य | ०—०—६ |
| आमचा धर्म | ०—०—६ | आर्य-पद्य-रत्नावली | ०—१—० |
| ग्रहदेवता | ०—०—६ | शतशब्द-रत्नमाला | ०—१—० |
| आमचीं धर्मशास्त्रें | ०—०—६ | बुवाशाही (नवीन छापत आहे. १ आणा) | |

याशिवाय आर्यसमाजाचीं सर्व प्रकारचीं पुस्तकें आमच्याकडे विकत मिळतात.

संचालक:—**लक्ष्मणराव ओघले**, श्रद्धानन्द-स्मृति-ग्रंथमाला,

अन्नपूर्णा भुवन किंग्ज सर्कल, म्यु. शाळेजवळ, माटुंगा, (जी. आय पी.) मुंबई १९

॥ ओ३म् ॥

# स्वधर्माचें सत्य स्वरूप

**प्रश्न १**—आर्यसमाज म्हणजे काय ?

**उत्तर**—जे लोक ईशप्रणीत चारी वेदग्रंथांना आपलें धर्मवाङ्मय समजतात व तदनुकूल आपलें वर्तन ठेवण्याचा प्रयत्न करतात, त्यांना आर्य म्हणतात; व अशा आर्य लोकांच्या समूहाला आर्यसमाज असें म्हणतात.

**प्रश्न २**—आर्यसमाजाची स्थापना कोणी व केव्हां केली?

**उत्तर**—आर्यसमाज हा कांहीं नवा पंथ किंवा सांप्रदाय नसून अनादिकालापासून जो सनातन वैदिक धर्म चालू आहे, त्याचेंच हें अव्यंग स्वरूप आहे. सनातन वैदिक धर्मामध्यें, ज्या अवैदिक व वेदविरुद्ध गोष्टी मागाहून घुसडून दिलेल्या आहेत, व ज्या अशा मागाहून घुसडून दिलेल्या गोष्टींमुळें, या तेजस्वी धर्माचें देदीप्यमान् स्वरूप नष्ट होऊन, त्यावर अन्यमतावलंबी लोक अपघात करूं लागले, व याच धर्मातील लोकांना खऱ्या वैदिक धर्माचें ज्ञान नाहींसें झाल्यामुळें—कारण वैदिक व नंतर घुसडून दिलेल्या गोष्टींनाही लोक धर्म म्हणूनच समजूं लागले—खरें काय व खोटें काय, सत्य कोणतें व असत्य कोणतें, हें समजेनासें होऊं लागलें, व हा अशा तऱ्हेचा तेजस्वी, पण नंतर विकृत स्वरूप प्राप्त झालेला, सनातन वैदिक धर्माचा डोलारा ढांसळून पडण्याच्या स्थितींत आला, त्यावेळीं महर्षि स्वामी दयानंद सरस्वतींनीं वेद व शास्त्रांचा अभ्यास करून, त्यांतून मूळ काय व मागाहून घुसडून दिलेलें कोणतें, याचें संशोधन केलें, व आपल्या ओजस्वी वाणीनें व लिखाणानें सर्व हिंदु समाजाला जागें करण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारें कालांतरानें प्राप्त झालेल्या विकृत स्वरूपाची छाटाछाट केल्यानंतर शिल्लक राहिलेल्या मूळ सनातन वैदिक धर्माकडे, आपलेपणानें पहाणाऱ्या लोकांच्या समूहाला,

आर्यसमाज असें म्हणतात. यावरून आर्यसमाज हा नवा पंथ नसून अगदीं मूळचा जो सनातन वैदिक धर्म तो हाच होय असें दिसून येईल.

**प्रश्न ३**—वेदांशिवाय इतर पुराण वगैरे पुस्तकें, तसेंच बायबल, कुराण वगैरे धर्मपुस्तकांसंबंधीं आर्यसमाजाचें काय मत आहे ?

**उत्तर**—जो कांहीं भाग–मग तो कोठेंही असो–वेदानुकूल असेल तो आर्यसमाज ग्राह्य समजतो व वेदांविरुद्ध असलेला त्याज्य समजतो.

**प्रश्न ४**—आर्यसमाजामध्यें कोणकोणत्या जातींचा प्रवेश होऊं शकतो ?

**उत्तर**—जो कोणी ईशप्रणीत वेदांना आपलें धर्मवाङ्मय समजून, त्याप्रमाणें आपलें वर्तन ठेवण्याविषयीं प्रयत्न करतो, त्याचा–मग तो जन्मानें कोणत्याही जातीचा किंवा धर्माचा असो—आर्यसमाजांत प्रवेश होऊं शकतो.

**प्रश्न ५**—आर्यसमाजांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे वर्णभेद आहेत काय ?

**उत्तर**—होय, आहेत. पण हे वर्णभेद जन्मावरून ठरविले जात नसून, ते प्रत्येकाच्या गुणकर्मांवरून, तो वयांत आल्यावर, ज्या तऱ्हेचा उद्योग तो करील, व आपलें आचरण ठेवील त्यावरून ठरविले जातात.

**प्रश्न ६**—आर्यसमाज ब्राह्मण क्षत्रियादि वर्णांमध्यें कोणत्या वर्णाला श्रेष्ठ मानतो ?

**उत्तर**—सर्व समाजचक्र सुस्थितीनें चालण्यास चारी वर्णांच्या लोकांची आवश्यकता असल्यामुळें, कोणत्याच वर्णाला उच्च, नीच समजत नाहीं; जो तो आपापल्या परीनें विशिष्ट विशिष्ट प्रसंगीं श्रेष्ठ असतो.

**प्रश्न ७**—आर्य सिद्धांताप्रमाणें एकाच कुटुंबांतील निरनिराळीं माणसें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशा तऱ्हेचीं होतील; मग हें दृश्य जरा विचित्र दिसणार नाहीं काय ?

**उत्तर**—नाहीं. ज्या कोणीं सर्जरीचा अभ्यास केलेला नाहीं, असा एखादा मनुष्य जर शस्त्र घेऊन एखाद्या माणसावर शस्त्रक्रिया करूं लागला, व या

कृत्याबद्दल पकडला गेल्यावर, तो आपला असा बचाव करूं लागला कीं मी अमुक अमुक भल्या मोठ्या डॉक्टरचा व सर्जनचा मुलगा आहे, तर त्याचा हा बचाव कितपत कामास येईल? त्याला विचारण्यांत येईल कीं, तूं स्वतः डॉक्टरची परीक्षा पास झाला आहेस काय? तुझा डॉक्टर बाप शस्त्रक्रिया करीत असला तरी तूं त्या विद्येंत अज्ञानी असल्यामुळें, तुला तो अधिकार पोचूं शकत नाहीं. तुला जर बापाप्रमाणें ऑपरेशन करणें आवडत असेल, तर प्रथम तूं डॉक्टरीचा अभ्यास कर, परीक्षा पास हो, म्हणजे मग तुला तो अधिकार येऊं शकेल; त्याच्या अगोदर नाहीं. त्याचप्रमाणें, एखाद्या जन्मानें ब्राह्मणाच्या मुलाला लोकांनीं ब्राह्मण समजावें असें वाटत असेल तर त्यानें विद्वान् बनून, ब्राह्मणाचीं जीं कर्तव्यें धर्मशास्त्रांत सांगितलीं आहेत, त्याप्रमाणें आचरण ठेवलें पाहिजे; नाहीं तर वर लिहिलेल्या डॉक्टरच्या मुलाप्रमाणें त्याची स्थिति होईल. उलट पक्षीं जर एखाद्या जन्मानें शूद्र मुलाची नैसर्गिक प्रवृत्ती विद्वान होण्याकडे असेल, तर त्यालाही योग्य तो अवसर मिळालाच पाहिजे. ब्राह्मणाच्या मुलाला जर आपण ब्राह्मणच रहावें असें वाटत असेल, तर ज्याप्रमाणें एखादा हुशार विद्यार्थी वर्गात पहिला नंबर आल्यावर स्वस्थ न बसतां, तो पहिला नंबर कायम टिकविण्याकरितां जारीनें अभ्यास चालू ठेवतो, त्याप्रमाणेंच ब्राह्मणाच्या मुलानेंही नेहमीं आपल्या बुद्धिची वाढ करण्याचा प्रयत्न करावयास पाहिजे. तसेंच ज्याप्रमाणें वर्गातील शेवटल्या मुलालाही अभ्यास करून आपला नंबर वरच काय, पण पहिलाही आणण्याचा अधिकार असतो, त्याचप्रमाणें जन्मानें शूद्र मुलालाही, इतर दुसऱ्या कोणत्याही वर्णात प्रवेश करण्याची पूर्ण मोकळीक असली पाहिजे. नाहींतर प्रत्येक वर्णातील मनुष्य जर त्याच वर्णात राहिला पाहिजे असें बंधन असेल, तर उन्नति मुळींच होऊं शकणार नाहीं. कल्पना करा कीं, एक शाळा आहे; तीमध्यें केव्हांही परीक्षा घेतली जात नाहीं, नियमितपणा, व्यवस्था, टापटीप व अभ्यास केल्याबद्दल मार्क वगैरे कांहींही मिळत नाहींत, व त्यामुळें मुलांचे नंबर खालीं किंवा वर जाणें, अशा तऱ्हेचा कांहीच प्रकार नाहीं. अशा शाळेची थोड्याच दिवसांत काय अवस्था होईल? सर्वच मुलें आळशी बनतील. कोणीही वेळेवर शाळेंत येणार नाहीं,

यास्तीर व शिस्त नाहींशी होईल. तेव्हां ही आपत्ति टाळण्याकरितां ज्याप्रमाणें शाळेंत चांगल्या गोष्टीला मार्क दिले जातात, वाईट गोष्टीबद्दल शिक्षा केली जाते, चांगले व जास्त मार्क मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा नंबर वर येतो, व हुशार विद्यार्थी परीक्षेत पास होऊन वरच्या वर्गात जातो, आणि अभ्यास न करणाराला तेथेंच खितपत पडावें लागतें, त्याचप्रमाणें वर्णाश्रमासंबंधीं सुद्धां झालें पाहिजे. कारण अशा तऱ्हेच्या चढाओढीमुळें समाजाची बौद्धिक, शारिरीक, औद्योगिक वगैरे सर्व तऱ्हेची उन्नति होईल, व सध्या समाजांत दिसत असलेलें शैथिल्य व औदासीन्य थोड्याच दिवसांत पार नाहींसें होऊन जाईल आणि प्रत्येक मनुष्य अवसर मिळाल्यास उन्नति करण्याचा प्रयत्न करील आणि वर असलेला मनुष्य आपण खालीं जाऊं, या भीतीनें आपली नेहमीं तयारी ठेवित राहिल. तसेंच सध्या एकादी जात स्वतांमध्यें कांहींही विशिष्ट गुण नसतांना सुद्धां दुसऱ्या जातीला कमी लेखते व मत्सर करते, त्यालाहि चांगलाच आळा बसेल. कारण ज्याची त्याची योग्यता ज्याच्या त्याच्या कर्तबगारीवर अवलंबून राहील; सध्याप्रमाणें नुसत्या जन्मावर रहाणार नाहीं.

**प्रश्न ८—आर्यसमाजांत आश्रमधर्मांची काय व्यवस्था आहे ?**

**उत्तर**—वैदिक धर्माप्रमाणें चारी आश्रमांची जरुरी आहे. परंतु ही आश्रमांची व्यवस्था सध्या पार बिघडून गेलेली आहे. ती घडी पुन्हां नीट बसावी व लोकांना त्याबद्दल गोडी उत्पन्न व्हावी, व चारी आश्रमांचा मूळ पाया जो ब्रह्मचर्याश्रम तो उत्तम रीतीनें पाळला जावा, म्हणून आर्यसमाजानें गुरुकुलांची स्थापना केलेली आहे. मुलांकरितां व मुलींकरितां निरनिराळीं गुरुकुलें असतात. गुरुकुलांमध्यें ८-९ वर्षांपेक्षां अधिक वयाच्या मुलांचा प्रवेश होऊं शकत नाहीं. हीं गुरुकुलें गजबजलेल्या जागेंत नसून रम्य व शांत जागीं असतात. मुलांना शिक्षकांच्या देखरेखीवांचून स्वतंत्र रीतीनें कोठेंही बाहेर जातां येत नाहीं. इतकेंच नव्हे तर त्यांना स्वतांच्या घरींही शिक्षणक्रम पुरा होईपर्यंत जातां येत नाहीं. मुलांच्या जवळच्या नातलगांना सुद्धां गुरुकुलांत येऊन भेटण्याची कांहीं ठराविक वेळींच परवानगी असते. गुरुकुलांतील आहार व इतर

कार्यक्रम अशा तऱ्हेचे आखलेले असतात कीं, जेणेंकरून त्यांच्या ब्रह्मचर्याचें उत्तम रीतीनें पालन होऊन तीं सुशील व सुदृढ बनतील. अशा प्रकारें गुरु-कुलांत राहून वयाला २५ वर्षे झाल्यानंतर मुलगे व १६ वर्षे झाल्यानंतर मुली आपला ब्रह्मचर्याश्रम संपवून गृहस्थाश्रमांत प्रवेश करण्यास लायक व योग्य बनतील व गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम व संन्यास या आश्रमांमध्यें आपलीं कर्तव्यें काय आहेत तीं समजून त्याप्रमाणें वागण्यास प्रवृत्त होतील.

**प्रश्न ९**—आर्यसमाज मूर्तिपूजा करतो काय ?

**उत्तर**—राम, कृष्ण वगैरे ज्या श्रेष्ठ विभूती झालेल्या आहेत, त्यांची आर्यसमाजी पूजा करतात; पण आर्यांची पूजा करण्याची तऱ्हा सध्याच्या प्रचलित तऱ्हेपेक्षा थोडी निराळी आहे. राम व कृष्णाच्या मूर्ती बनवून त्यांची पूजा करावयाचे ऐवजीं, आर्यसमाजी त्यांच्या गुणांची पूजा करतात. आर्यलोक त्यांची गुणोपासना करतात. त्या विभूतींमध्यें जे आदर्श गुण होते, त्या गुणांची उपासना करून ते गुण आपणांमध्यें आणण्याचा ते प्रयत्न करतात. त्या महान् विभूतींच्या मूर्ती बनवून त्या त्या मूर्तींच्या वर किंवा समोर त्या मूर्तींना अनवश्यक अशा वस्तु ठेवण्यापेक्षां, त्या विभूतींच्या गुणांची उपासना करण्या-पासूनच मनुष्याचें हित होईल, असा आर्यसमाजीयांचा दृढ विश्वास आहे.

**प्रश्न १०**—आर्यसमाजी कोणालाच अस्पृश्य समजत नाहीं काय ?

**उत्तर**—जो मनुष्य स्पर्श करण्याला सुद्धां योग्य दिसत नसेल इतक्या भयंकर मलीन स्थितींत असेल त्याला आर्य लोक त्या वेळेपुरता अस्पृश्य समज-तात. मैल्याची टोपली घेऊन जातेवेळीं भंग्याला तशा स्थितींत शिवणें श्रेयस्कर नाहीं. तात्पर्य हें कीं मलीन स्थितींत असलेल्या कोणाही माणसाला शिवूं नये. भंगी जर मैला नेण्याचें काम बंद करतील, तर केवढा दुर्धर प्रसंग ओढवेल ? ते जें काम करतात त्याची फार जरुरी आहे. ते त्या तऱ्हेचें काम करीत असतांना त्यांना आपण शिवूं नये. पण इतर वेळीं ते जर आपणासारखे नीट स्नान करून स्वच्छ कपडे घालून आले, तर विनाकारण त्यांना लांब कां लोटावें ? तसेंच अस्पृ-श्याचा मुलगा जो आपल्या मुलाप्रमाणेंच रोज स्नान करतो, स्वच्छतेनें रहातो व

झाळेंत जातो तो अस्पृश्य कसा होऊं शकतो हेंच समजत नाहीं. शायदासुद्धां वाड-वडिलांच्या अपराधाबद्दल पुढच्या पिढीच्या माणसांना व नातलगांना जबाबदार समजत नाहीं. प्राचीन काळीं कांहीं अपराधाबद्दल जर एखाद्या माणसाला वाळींत टाकलें असेल? तर तें वाळींत टाकणें जास्तींत जास्त कडक असलें तरीहि तो इसम मरेपर्यंत तें सहन करूं शकेल; पण तो मेल्यावर त्याच्या अनाथ बायकामुलांवर बहिष्कार चालू ठेवणें, या अन्यायाला व जबरजस्तीला काय म्हणावें हेंच समजत नाहीं. आपले अस्पृश्य बांधव जोपर्यंत डोक्यावर शेंडी ठेवतात, गाईला व रामकृष्णादिकांना पूज्य मानतात, आपणांशीं नम्रतेनें वागतात, तोंपर्यंत ते जवळ येण्याला नालायक असतात; पण तेच उद्यां खिश्चन किंवा मुसलमान झाले, शेंडीला चाट देऊन दाढी वाढवूं लागले, गाईला पूज्य मानण्याऐवजीं तिची कत्तल करूं लागले, व अशा जिवंत मारलेल्या गायींचें मांस खाऊं लागले, व आपल्या पवित्र पूर्वजांना पूज्य मानावयाचे ऐवजीं, ते जमावानें येऊन त्यांचीं पवित्र मंदिरें फोडूं लागले, उच्च वर्णीय हिंदुवर आपली सांवली पडूं नये म्हणून बाजूला होऊन वांकून चालणारे हेच उद्यां आमच्या बायका-मुलींची जबरजस्तीनें बेअब्रु करूं लागले म्हणजे मग त्यांना आपण स्पृश्य समजूं लागतों. गोरक्षकाचा गोभक्षक झाला म्हणजे त्याची अस्पृश्यता नाहींशी होते. महादेवाचा महंमद किंवा मॅथ्यु बनला म्हणजे त्याला शिवावयास आपणांस कांहींही वाटत नाहीं; आणि वाटून तरी काय उपयोग? कारण ज्याप्रमाणें रस्त्यांत महाराला आपण शिवूं नको असें म्हणतों, तसें जर मुसलमानाला किंवा खिश्चनाला म्हटलें, तर त्याबद्दल आपणांवर खटला होऊन दंड होईल. तेव्हां या बाबतींत आपण वेळींच शहाणें व्हावयास नको काय? जोंपर्यंत ते स्वतास हिंदु म्हणवून घेतील, तोंपर्यंत ते अस्पृश्यच राहणार आणि त्यांना जर स्वतांची अस्पृश्यता नाहींशी व्हावी असें वाटत असेल, तर त्यांनीं परधर्मांत जावें, असें त्यांना आपण स्वतांच सांगतों, असाच या सर्व गोष्टीचा अर्थ होत नाहीं काय? अस्पृश्यांची अस्पृश्यता घालविण्याकरितां त्यांचा हात धरून त्यांना आपण परधर्मांत ढकलीत आहोंत. हिंदुस्थानांत आज जे ८ कोटी मुसलमान दिसतात, ते कांहीं अरबस्तान, तुर्कस्तान इत्यादि बाहेरून कोठून

येथें येऊन राहिलेले नाहींत. त्या देशांतून जर इतके लोक इकडे येऊन राहिले असते, तर तिकडची लोकसंख्या कमी झाली असती. पण तसें कांहींच झालेलें नाहीं. सुमारें ४० हजार मुसलमान लोक बाहेरून हिंदुस्थानांत आलेले असावे, असा युरोपियन इतिहासकारांचा अंदाज आहे; एवढया ४० हजारांपासून ८ कोटींची उत्पत्ति होणें संभवनीय नाहीं. शिवाय आपली लोकसंख्या सारखी कमी कमी होत आहे. यावरून दिसून येईल कीं, हे जे आज ८ कोटी मुसलमान म्हणून दिसत आहेत, ते दुसरे तिसरे कोणी नसून आमच्या हिंदु हाडामांसाचेच आम्हीं झिडकारून टाकून दिलेले, आमचेच धर्मबंधु आहेत. हा ओघ जर असाच पुढें चालू राहिला तर काय प्रसंग ओढवेल याची कल्पना करणेंहि भयावह आहे असें थोड्याशा विचारांतीं कोणासही दिसून येईल.

**प्रश्न ११**–परधर्मांत गेलेल्या माणसांची शुद्धि करण्याची काय जरुरी आहे?

**उत्तर**—कल्पना करा कीं पाण्यानें भरलेला असा एक हौद आहे, व त्याला पाणी बाहेर सोडण्याकरितां एक तोटी आहे. परंतु त्या हौदाला पाणी आंत येण्यास जर मुळींच रस्ता नसेल तर थोड्याच वेळांत तो हौद खलास होऊन जाईल. त्याचप्रमाणें हिंदुधर्मांतून माणसें बाहेर निघून जात राहतील, व हिंदुधर्मांत येण्याला जर रस्ता नसेल, तर कालांतरानें हिंदु धर्म खलास होऊन जाईल. हौद रिकामा न व्हावा, याकरितां ज्याप्रमाणें पाणी बाहेर जाण्यास तोटी आहे, त्याप्रमाणें हौदांत पाणी येण्यासही रस्ता ठेवला पाहिजे. त्याचप्रमाणें हिंदुधर्मांतून माणसें बाहेर जातात, त्याप्रमाणें हिंदुधर्मांत येण्यासही रस्ता केला पाहिजे; व तो रस्ता म्हणजे शुद्धि हा होय. जुलूम जबरजस्तीनें, किंवा फसून जीं माणसें, स्त्रिया व अज्ञान बालकें परधर्मांत गेलीं असतील आणि संधि मिळाल्यास तीं जर परत स्वधर्मांत येण्यास मोठया खुशीनें तयार असतील, तर त्यांना हिंदुधर्मानें आपला दरवाजा बंद कां करावा? तसेंच एखाद्या जन्मानें परधर्मीय माणसाला वैदिक धर्मांतील उच्च तत्वें पटून जर आर्यधर्माचा अंगिकार करावासा वाटला, तर त्याला जरूर शुद्ध करून घ्यावयास पाहिजे. शुद्धि केल्यानें गोभक्षक असलेला मनुष्य गोरक्षक बनतो, आणि म्हणून एवढयासाठीं तरी

प्रत्येकानें शुद्धि करण्यास मदत करावी आणि आपला श्रेष्ठ वैदिक धर्म विश्वव्यापी धर्म असल्यामुळें शुद्धिद्वारा त्याचा विश्वांत प्रचार करावा.

**प्रश्न १२**—विवाहकालाबद्दल वगैरे आर्य-धर्म काय सांगतो ?

**उत्तर**—योग्य शिक्षण व शरीराची पूर्ण वाढ झाल्यावर वयाच्या २६ व्या वर्षी मुलांचे व १६ व्या वर्षी मुलींचे यथा योग्य जोड पाहून विवाह करावेत. यापेक्षां लहान वयाचे विवाह होऊं नयेत. तसेंच विजोड विवाहहि होऊं नयेत. वृद्ध रोगी माणसांचेहि विवाह होऊं नयेत.

**प्रश्न १३**—पुनर्विवाहाबद्दल काय मत आहे ?

**उत्तर**—वर सांगितल्याप्रमाणें योग्य काळीं व सजोड विवाहाचीच पद्धति अमलांत असती, तर आज हिंदुसमाजामध्यें जो विधवांचा एवढा मोठा आंकडा दिसतो, तेवढा तो दिसला नसता. ज्या विधवा स्त्रियांच्या उपजीविकेची चांगली व्यवस्था असेल व ज्यांना व्रतस्थ राहणें शक्य वाटत असेल, त्यांनीं पुनर्विवाह केलाच पाहिजे असें नाहीं. त्यांनीं खुशाल तसें रहावें. परंतु ज्यांच्या पोटापाण्याची कांहींच व्यवस्था नाहीं, किंवा व्रतस्थ राहणें ज्यांना अवघड वाटत असेल त्यांनीं योग्य मनुष्याची निवड करून पुनर्विवाह करावा व्रतस्थ राहणें हें काम अतिशय अवघड आहे. तेव्हां रूढीच्या विरुद्ध जाण्याचें धैर्य होत नाहीं म्हणून कांहीं तरी चोरटे व्यवहार करून, त्याचा शेवट फौजदारी गुन्हा करण्यांत किंवा परधर्मांत पळून जाण्यांत होण्यापेक्षां, पुनर्विवाह करणें हा योग्य मार्ग आहे. शिवाय पुरुषवर्गानें एक पत्नी निवर्तल्यावर दुसरें लग्न करण्यांत जर गैरशिस्त असें कांहीं नाहीं, तर स्त्रियांच्या पुनर्विवाहाच्या बाबतींतच तेवढी अडचण कां असावी ? पुरुषाची एक स्त्री निवर्तल्यावर त्याला जर पुनर्लग्न करणें असेल तर त्यानें तें विधवेशींच करावयास पाहिजे. कुमारिकेशीं लग्न करण्याचा त्याला मुळींच अधिकार नाहीं. विधवांच्या पालकांनीं स्वतांवरून व्रतस्थ राहाणें हें कसें कठीण आहे, याची कल्पना करून चालू रूढीची पर्वा न करितां, विधवा झालेल्या आपल्या मुली, बहिणी, यांना पुनर्विवाहाला योग्य तो सल्ला द्यावा. रूढीच्या संकोचानें लाजून त्या नकार देतील, पण आपण स्वतांवरून

कल्पना करून आपल्या बालकाची योग्य ती काळजी घ्यावी; व ज्याच्या योगें सध्या होत असलेली बालहत्या, आत्महत्या, आणि परधर्मांत जाऊन त्या धर्मांची संख्या वाढविणें यासारख्या प्रकारांना आळा बसेल, याविषयीं प्रत्येकानें खबरदारी घ्यावी.

**प्रश्न १४**—आर्यसमाज ही सरकारविरोधी संस्था आहे काय ?

**उत्तर**—मुळींच नाहीं. मोठमोठे जज्ज, मॅजिस्ट्रेटस् व बडे बडे पोलीस ऑफिसर्स, यांसारखे सरकारी अंमलदार आर्यसमाजी आहेत. सरकार व्यक्तीच्या धर्मस्वातंत्र्याच्या आड मुळींच येत नाहीं; तेव्हां आर्यसमाजाचा सभासद होण्या-बद्दल कोणालाही साशंक होण्याचें कारण नाहीं.

**प्रश्न १५**—सध्या आर्यसमाजातर्फे काय काय काम चालू आहे ?

**उत्तर**—सर्व जगांत जवळ जवळ १५१० आर्यसमाज असून समाजांचीं स्वतःचीं ८३४ मंदिरें आहेत. आर्यसमाजियांची संख्या ८ लाखांच्या आंत बाहेर आहे ( यांत न नोंदले गेलेले व व्यापारधंद्यामुळें दुसऱ्या सदरांत घातले गेलेले लोक जमेस धरलेले नाहींत; शिवाय नुकत्याच घेण्यांत आलेल्या मनुष्यगणनेनंतर किती तरी आर्यसमाजी बनलेले आहेत. ) १६५ वेतनिक, २२९ अवेतनिक, १३० संन्यासी, तसेंच ४०० स्वतंत्र प्रचारक आणि भजनोपदेशक आर्यसमाजाचा प्रचार करीत आहेत. ७ कॉलेजें, २०० हायस्कूल्स, १५० इंग्रजी शाळा, १९२ प्राथमिक शाळा व १४२ रात्रीच्या शाळा आहेत. २८ गुरुकुलें, ३०० संस्कृत पाठशाला, ३ कन्या गुरुकुलें आहेत. १ कन्या कॉलेज, २ कन्या हायस्कूल्स व ७०० कन्या पाठशाळा आहेत. ५० अनाथालयें, ४० विधवाश्रम आणि १४ मोफत औषधालयें आहेत. आर्यसमाजाचीं सभाधीन ३० मुद्रणालयें व १०१ पुस्तकालयें आहेत. २ योगमंडळें आणि संन्यासी पाठशाळा आहेत. हिंदु, उर्दू, इंग्रजी, गुजराती, मराठी, तेलगू, सिंधी, इत्यादि भिन्न भिन्न भाषांतून दैनिकें, साप्ताहिकें, पाक्षिकें आणि मासिकें वगैरे ४० च्यावर आहेत. डी. ए. व्ही. कॉलेज गुरुदत्तभवन, दयानंद ब्राह्मविद्यालय व वैदिक आश्रम या लाहोर शहरांतील तीन

संस्थामार्फत संशोधनाचें कार्य चालू आहे. लखनौमध्यें एक आर्यन-को-ऑपरेटिव्ह बँक आहे. भारतांत आणि विदेशांत प्रांतावार **आर्यप्रतिनिधि** सभा आहेत. सदर सभा आर्यसमाजे व आर्यसमाजी संस्थांचें संघटन, निरीक्षण, उपदेश, वेदप्रचार, वाङ्मयप्रसार, व आर्यसमाजाच्या अंतर्गत कार्यावर अधिकार चालविण्याचें कार्य करतात. अशा प्रतिनिधि सभांचीं केंद्रें लाहोर ( पंजाब प्रांत ), आग्रा ( संयुक्तप्रांत ), कलकत्ता ( बंगाल व बिहार ), नरसिंगपूर ( मध्यप्रांत व वऱ्हाड ), अजमेर ( राजस्थान ), मुंबई ( मुंबई प्रांत ), हैदराबाद [ निजामप्रांत ], हैदराबाद [ सिंधप्रांत ], रंगून [ ब्रह्मदेश ], पोर्टलोईस [ मॉरिशस बेटें ], डेकीन्स [ दक्षिण आफ्रिका ] अशीं आहेत. याशिवाय इंग्लंड, अमेरिका, ब्रिटीश चायना, जर्मनी, फ्रान्स, इराक, अरबस्थान, तिबेट; चीन, जपान, ऑस्ट्रेलिया, मलाया आदि भागांत आर्यसमाज स्थापन झाले आहेत व होत आहेत.

**प्रश्न १६**—सध्या हिंदूंचें सामाजिक कर्तव्य काय आहे?

**उत्तर**—प्रत्येक माणसानें व्यक्तिशः निरनिराळें काम करण्यापेक्षां सामुदायिक रीतीनें काम करणें फार सुलभ, इष्ट व फायदेशीर असतें. आर्यसमाजाकडून जें कांहीं थोडेंबहुत काम होत आहे तें वर दाखविलेंच आहे. तेव्हां प्रत्येक स्त्री-पुरुषानें आर्यसमाजाचे सभासद होऊन किंवा अन्य तऱ्हेनें समाजातर्फे चाललेल्या कार्यास हातभार लावून, उपजीविकेसाठीं किंवा इतर अनेक सामाजिक त्रासांस कंटाळून मरणमार्गांत जाणाऱ्या लोकांचें व अनाथ बालकें व स्त्रियांचें रक्षण करण्याचें पुण्य आपल्या पदरीं घ्यावें एवढीच नम्र विनंति आहे.

---

महाराष्ट्रांतील आर्यसमाजांचें संघटन करण्याकरितां व आर्यसमाजाच्या तत्त्वांचा प्रचार व्याख्यान व वाङ्मयद्वारा करण्याकरितां बृहन्महाराष्ट्र आर्यपरिषद ही संस्था स्थापन झाली आहे. विशेष माहितीकरितां लिहा—

मंत्री, **बृहन्महाराष्ट्र आर्यपरिषद**, C/o आर्यसमाज, माटुंगा.

न्यू मनोहर प्रिंटिंग प्रेस, आंग्रेवाडी, मुंबई, नं. ४